**वाचा -** 1. दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम,2016 मधील कलम 23 नुसार.
2. शासन निर्णय, ग्राम विकास विभाग, क्र. अपंग-2019/प्र.क्र.714/आस्था-7, दि.07 सप्टेंबर 2019.

---

**आदेश**

**क्र.जिपना/साप्रवि/आस्था 2/460/25**
**सामान्य प्रशासन विभाग**
**जिल्हा परिषद, नाशिक**
**दि. 07 ऑक्टोंबर 2025.**

वाचा क्र. 2 चे शासन निर्णयानुसार दिव्यांग व्यक्तीसाठी तयार करण्यात आलेल्या दिव्यांग व्यक्ती हक्क 2016 ची अंमलबजावणी व त्या अनुषंगाने करावयाची कार्यवाही नमुद केले आहे. त्यात जिल्हास्तरावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हा तक्रार निवारण समिती गठीत करण्याचे निर्देश दिलेले आहे.

02. त्यानुसार जिल्हा परिषद, नाशिक अतर्गत जिल्हास्तरावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हा तक्रार निवारण समिती खालील प्रमाणे गठीत करणेत येत आहे,

| अ.क्र. | अधिकारी यांचे पदनाम | समितीचे पद |
|---|---|---|
| 1 | **मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नाशिक** | **अध्यक्ष** |
| 2 | **अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नाशिक** | **सदस्य** |
| 3 | **मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हा परिषद, नाशिक** | **सदस्य** |
| 4 | **जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद, नाशिक** | **सदस्य** |
| 5 | **उप मुख्य कार्यकारी अधिकारी (साप्रवि), जिल्हा परिषद, नाशिक** | **सदस्य सचिव** |

03. या समितीचे कामकाज खालीलप्रमाणे ,

(1) सदर समिती ही दिंव्याग व्यक्तींच्या जिल्हापातळी वरील तक्रारी संबधात तक्रार निवारण समिती म्हणून तसेच तालुका पातळीवरील तक्रारी संबधात अपिलीय प्राधिकारी म्हणून काम पाहील.

(2) जिल्हा स्तरावरील प्राप्त होणाऱ्या तक्रारीवर 45 दिवसांच्या आत तक्रार निवारण करण्यात यावी.

(3) तालुकास्तरावरील तक्रार समितीच्या तक्रार निवारण अधिकाऱ्याच्या कार्यवाहीवर तक्रारकर्त्यांचे समाधान न झाल्यामुळे प्राप्त होणाऱ्या अपिलामध्ये 45 दिवसांच्या आत सदर अपिलावर कार्यवाही करावयाची आहे.

(4) सदर समितीची बैठक दर महिन्याच्या 15 तारखेला घेण्यात यावी, तसेच ज्या महिन्यामध्ये 15 तारखेला कार्यालयीन सुटटी असेल त्या महिन्यामध्ये सदरची बैठक पुढील लगतच्या कार्यालयीन दिवशी घेण्यात यावी.

(5) या बैठकिमध्ये जिल्हास्तरावर प्राप्त तक्रारी तसेच तालुकास्तरावरील अपिल यांच्या कार्यवाहीबाबत निर्णय / आढावा घेण्यात यावा.

**ओमकार पवार** (भा.प्र.से.)
**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**जिल्हा परिषद नाशिक**

**प्रति -**
1. **अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नाशिक.**
2. **मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हा परिषद, नाशिक.**
3. **जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद, नाशिक.**
4. **उप मुख्य कार्यकारी अधिकारी (साप्रवि), जिल्हा परिषद, नाशिक.**

**प्रत -**
1. मा. सचिव, दिव्यांग कल्याण विभाग, मंत्रालय, मुंबई, यांना माहीतीसाठी सविनय सादर.
2. मा. आयुक्त, दिव्यांग कल्याण आयुक्तालय, म.रा. पुणे, यांना माहीतीसाठी सविनय सादर.
3. प्रादेशिक उपायुक्त, समाजकल्याण विभाग, नाशिक, यांना माहीतीसाठी सस्नेह अग्रेषित.
4. खाते प्रमुख ...............(सर्व), जिल्हा परिषद, नाशिक यांना माहीतीस्तव.
5. गट विकास अधिकारी (उ.श्रे), पंचायत समिती, ............(सर्व) यांना माहीतीस्तव व कार्यवाहीस्तव.
6. जिल्हा दिव्यांग सक्षमीकरण अधिकारी, नाशिक यांना माहीतीस्तव.
7. कार्यालयीन ज्ञापन नस्ती.